# कार्यकारी सारांश

## 6,00,000 TPA पिकल्ड हॉट रोल्ड (HR), कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स (CRFH), गॅल्वनाइज्ड/ॲल्युझिंक तसेच कलर PPGI/PPGL कॉइल्स व शीट्स यांचे उत्पादन

**प्लॉट क्र. D–4, MIDC औद्योगिक क्षेत्र, उमरेड,**
**तालुका उमरेड जिल्हा नागपूर, महाराष्ट्र राज्य**

तर्फे

प्रकल्प प्रर्वतक

***मेसर्स कलरशाइन इंडिया प्रायवेट लिमिटेड (CIPL)***

COLORSHINE
AN ABHAY ISPAT ENTERPRISE

पर्यावरणीय सल्लागारः



**पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस (PECS)**
धंतोली पोलिस स्टेशन जवळ, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र
*Email: pecsnagpur@gmail.com*
*Accreditation no.:NABET/EIA/25-28/RA0474*
*Valid upto 16th October 2028*

# कार्यकारी सारांश

## 1.0 प्रस्तावना

प्रस्तावित ग्रीनफिल्ड प्रकल्पामध्ये पिकल्ड हॉट रोल्ड (HR), कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स (CRFH), गॅल्वनाइज्ड / अलुझिंक कॉइल्स तसेच कलर कोटेड गॅल्वनाइज्ड / अलुझिंक कॉइल्स आणि शीट्स यांचे उत्पादन करण्यात येणार आहे. प्रस्तावित प्रकल्पाचे ठिकाण हे प्लॉट क्र. D–4, MIDC औद्योगिक क्षेत्र, उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर, महाराष्ट्र राज्य येथे स्थित आहे. या प्रकल्पाची प्रस्थापित उत्पादन क्षमता 6,00,000 TPA (टन प्रति वर्ष) राहील. प्रकल्पाची एकूण किंमत रु. 950 कोटी आहे. हा प्रकल्प उभारण्यासाठी CIPL ने MIDC कडून 11.647 हेक्टर जमीन लिजवर घेतली आहे.


हा EIA/EMP अहवाल महाराष्ट्र राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र यांनी पत्र क्र. F. No.: SIA/MH/IND1/563389/2025 दिनांक 13/01/2026 अन्वये जारी केलेल्या संदर्भ अटींनुसार (Terms of Reference & ToR) तयार करण्यात आला आहे.





**स्रोतः सर्वे ऑफ इंडिया *(SOI)* टोपोशीट**

**स्थलाकृतिक नकाशा (10 किमी त्रिज्या)**




**प्रकल्प क्षेत्राचे छायाचित्र**




| COLORSHINE COATED PVT LTD. | | | DATE :- | 23-12-2025 |
|---|---|---|---|---|
| AREA STATEMENT OF MASTER PLANT LAYOUT | | | | |
| S. NO. | AREA DISCRIPTION | AREA | UNIT | % |
| | TOTAL PLOT AREA | 116470.00 | Sqm | |
| 1 | SHED AREA | 42951.84 | Sqm | 37 |
| 2 | CONSTRUCTED AREA (ETP,STP & ECR ETC) | 6361.81 | Sqm | 5 |
| 3 | RECREATION GARDEN AREA | 8325.00 | Sqm | 7 |
| 4 | GREEN AREA | 17449.00 | Sqm | 15 |
| 5 | PARKING AREA | 11226.00 | Sqm | 10 |
| 6 | AMENITIES | 4298.00 | Sqm | 4 |
| 7 | ROAD AREA | 19884.00 | Sqm | 17 |
| 8 | DRAIN AREA | 5974.35 | Sqm | 5 |
| | **Total** | 1,16,470.00 | Sqm | 100.00 |

**INDEX**

| | |
|---|---|
| | PLOT BOUNDARY |
| | STRUCTURE/SHED |
| | PARKING AREA |
| | ROAD |
| | GREENBELT |
| | AMENITY AREA |

Manufacturing of 6,00,000 TPA Hot Rolled (HR), Cold Rolled (CR) and Galvanized/ Galvalume Coils / Sheets By, Colorshine India Private Limited (CIPL)
At, Plot No. D-4, MIDC Industrial Area, Umred, Tal: Umred; Dist: Nagpur, Maharashtra State.


**प्लांट लेआऊट**

## 2.0 प्रकल्पाचे विवरण

### प्रकल्पाची रूपरेषा

| अनु क्र. | विवरण | तपशिल |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे नाव | कलरशाइन इंडिया प्रायवेट लिमिटेड (CIPL) |
| 2 | प्रकल्प स्थळ | प्लॉट क्र. D–4, MIDC औद्योगिक क्षेत्र, उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर, महाराष्ट्र |
| 3 | कॉन्फिगरेशन | पिकल्ड हॉट रोल्ड (HR), कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स (CRFH), गॅल्वनाइज्ड / अलुझिंक कॉइल्स तसेच कलर कोटेड गॅल्वनाइज्ड / अलुझिंक कॉइल्स आणि शीट्स यांचे उत्पादन |
| 5 | पाण्याची आवश्यकता | आवश्यकता: 1000 KLD<br>स्त्रोत : MIDC |
| 6 | विजेचा आवश्यकता | 25MW<br>स्त्रोत : MSEDCL |
| 7 | प्रस्तावित प्लांट करिता जमिन | 11.647 ha |
| 8 | मनुष्यबळ | स्थायी स्वरूपी: 300 Nos.<br>कंत्राती कामगार : 350 Nos. |
| 9 | पर्यावरणीय घटक | **वायु पर्यावरण:**<br>प्रकल्पात वायू प्रदूषणाचे दोन प्रमुख स्रोत आहेत विविध हाताळणी तसेच हस्तांतरण केंद्र व विविध ज्वलन युनिट्समधून निर्माण होणारी फ्लू गैस व फर्नेस पासून निर्माण होणारी फ्लू गैस वेट स्क्रबरमध्ये शुद्ध केली जाईल आणि त्यानंतर ते चिमणीद्वारे वातावरणात सोडली जाईल.<br><br>**जल:**<br>• प्रक्रिया कार्यांपासून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्याला प्रक्रियाकृत करणासाठी पुरेशा क्षमतेचा ETP स्थापित करण्यात येईल.<br>• स्वच्छता कार्यापासून निर्मित होणाऱ्या घरगुती सांडपाण्याची STP प्रक्रियाकृत केले जाईल- |
| 9 | प्रकल्पाची अंदाजित किमत | रू. 950 कोटी |

## 3.0 प्रक्रिया वर्णन




**उत्पादन प्रक्रिया**

## 4.0 पर्यावरणाचे वर्णन

### वायु पर्यावरण

वायुच्या प्रमुख दिशेच्या आधारे निवडलेल्या 8 ठिकाणी निरीक्षण केलेल्या सभोवतालच्या वायुच्या गुणवत्तेत खालील श्रेणी दर्शविल्या आहेत.

$PM_{10}$ : 42.0 – 69.7 µg/m$^3$.

$PM_{2.5}$ : 16.1 – 30.1 µg/m$^3$

$SO_2$ : 9.0 – 20.2 µg/m$^3$

$NO_x$ : 11.0 – 27.8 µg/m$^3$

| आद्योगिक क्षेत्र निवासी, ग्रामिण क्षेत्र (CPCB Norms) | $PM_{10}$ | $PM_{2.5}$ | $SO_2$ | NOx |
|---|---|---|---|---|
| | 100 µg/m$^3$ | 60 µg/m$^3$ | 80 µg/m$^3$ | 80 µg/m$^3$ |

$PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, व NOx ची तिव्रता राष्ट्रीय परिवेशी गुणवत्ते च्या प्रमाणाच्या आत (NAAQS) आढळली.

## जल पर्यावरण

8 भुपृष्ठजल व 8 भुजलाचे असे एकुण 16 नमुने गोळा करून त्याचे विश्लेषण करण्यात आले. पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण, पाणी व सांडपाण्याची विश्लेषण पद्धती, अमेरिकन पब्लिक हेल्थ असोशिएशन (APHA) पब्लिकेशन च्या प्रमाणित पध्दतीच्या अनुसार करण्यात आले. माहितीनुसार असे निदर्शनास आले की भुजल तसेच भूपृष्ठजलाची गुणवत्ता हि (IS 10500-2012) ने निर्धारित केलेल्या अनुसंबंधित प्रमाणांच्या आत होती.

## ध्वनि पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व आठ निरीक्षण केंद्रांवर ध्वनी पातळी रात्रीच्या वेळी 39.1 dB (A) रात्रीच्या वेळी ते दिवसा 55.5 dB (A)या मर्यादेत आढळून आली आहे. ध्वनीची कमाल पातळी दिवसाच्या वेळी अधिक नोंदविण्यात आली असून, कारण बहुतेक कामकाज दिवसा पार पडतात.

राष्ट्रीय वातावरणीय ध्वनी गुणवत्ता मानकांबाबत पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या (MoEF&CC) राजपत्र अधिसूचनेनुसार, आठही निरीक्षण केंद्रांवर मोजलेली ध्वनी पातळी निवासी क्षेत्रासाठी निर्धारित 65.0 dB(A) तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी निर्धारित 75.0 dB(A) या मर्यादांच्या आत आढळून आली आहे.

## भूमि पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या सभोवतालील मृदाचे त्याच्या भैतिक व रासायनिक गुणवैशिष्ठ्याचे मुल्यांकन करण्याकरिता अभ्यास क्षेत्रातील आठ मृदा नमूने संकलित करण्यात आले. घटकांनुसार मृदा गुणविशेषांचे निरिक्षण खालील प्रमाणे आहे.

मातीच्या वैशिष्ट्यांवरील निरीक्षणांची चर्चा खाली संबंधित मापदंडांनुसार करण्यात आली आहे.

- सर्व संकलित मृदा नमुन्यांची पोत क्ले यात वर्गीकृत करण्यात आली

- कृषक व पडित जमिनीच्या संकलित नमुन्याचा रंग काळा व गढद तपकीरी, आहे.
- मृदा गोळा केलेल्या नमुन्यात स्थूल घनता 1.34 ते 1.52 gm/cc आहे.
- मृदा नमुन्यामधे pH ची मात्रा 7.35 ते 7.62 श्रेणीत आहे. pH मात्रा मृदा नमुन्याची प्रकृती अल्कधर्मी असल्याचे दर्शविते
- मृदा नमुन्यामधे वाहकता 0.239 व 0.358 μmhos/cm श्रेणीमधे आहे.
- मृदा नमुन्यामधे जैविक पदार्थ 0.50 ते 1.41 % च्या मधे आहे. जे जमिनीची सुपिकता दर्शवितात.
- मृदा नमुन्यामधे उपलब्ध नायट्रोजनची तीव्रता 192.3 ते 543.7 kg/ha च्या श्रेणित आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध फॉस्फोरसची तिव्रता 11.69 ते 32.11 kg/ha आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध पोटॅशियमची तिव्रता 195.4 ते 352.7kg/ha आहे.

## 5.0 संभावित पर्यावरणीय परिणाम व नियंत्रणाचे उपाय

### वायु पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्पामध्ये हॉट रोल्ड कॉइल (HRC), पिकलिंग रसायने (HCl/Acid), झिंक इनगॉट्स , झिंक–ॲल्युमिनियम इनगॉट्स , सिलिकॉन तसेच कलर कोटींग रसायने जसे की पेंट्स, रेझिन्स आणि सॉल्व्हेंट्स यांचा वापर करणे समाविष्ट आहे. या कच्च्या मालाची हाताळणी, साठवणूक आणि वाहतूक योग्य प्रकारे न केल्यास काही पर्यावरणीय परिणाम उद्‌भवू शकतात. अपेक्षित परिणाम आणि त्यासाठी प्रस्तावित प्रतिबंधात्मक उपाययोजनांची चर्चा खाली करण्यात आली आहे.

### संभाव्य परिणाम

- कच्च्या मालाच्या लोडिंग/अनलोडिंग आणि हाताळणीदरम्यान फ्यूजिटिव उत्सर्जन होऊ शकते.
- पिकलिंग रसायनांच्या (HCl) साठवणूक आणि वापरामुळे आम्लयुक्त फ्यूम निर्मित होऊ शकतात.

- कलर कोटिंग रसायने, पेंट्स आणि रेझिन्स यांच्या वापरामुळे व्होलाटाइल ऑर्गॅनिक कंपाऊंड्स VOC उत्सर्जन आणि सॉल्व्हेंट वाफ निर्माण होऊ शकते
- कच्चा माल आणि तयार उत्पादनांच्या वाहतुकीमुळे वाहनांमधून होणाऱ्या वायू उत्सर्जनात वाढ होऊ शकते.

**नियंत्रण उपाययोजना**

- सर्व कच्चा माल आच्छादित साठवणूक क्षेत्रांमध्ये साठविला जाईल.
- एसिड (Acid) साठवण टाक्यांसाठी योग्य वायुवीजन (Ventilation) आणि फ्यूम गैस निष्कर्षण (Fume Extraction) प्रणालीची व्यवस्था केली जाईल.
- पिकलिंग विभागात HCl उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी एसिड फ्यूम धूर स्क्रबर (Acid Fume Scrubbers) बसविण्यात येईल.
- फर्नेसमधून (Furnaces) निर्माण होणारे फ्यूम गैस वेट स्क्रबरद्वारे (Wet Scrubber) शुद्ध करून चिमणीद्वारे (Stack) वातावरणात सोडले जातील.
- VOC असलेले रंग (Paints) आणि द्रावके (Solvents) बंद कंटेनरमध्ये साठवली जातील.
- फ्यूजिटिव धुळीचे (Fugitive Dust) उत्र्सजन नियंत्रित करण्यासाठी नियमित पाणी फवारणी आणि योग्य स्वच्छता (Housekeeping) राखली जाईल.
- धूळ निर्मिती कमी करण्यासाठी अंतर्गत रस्त्यांचे पक्के केले जातील.
- कच्चा माल वाहतूक करणाऱ्या वाहनांचे वैध PUC प्रमाणपत्र राहिल आणि वाहनांना योग्य प्रकारे आवरण केले जाईल याची खात्री केली जाईल.

**मॉडेलिंग परिणामांवरील चर्चा (Discussion on Modelling Results)**

प्रस्तावित प्रकल्पाच्या कार्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रमुख प्रदूषकांच्या ($PM_{10}$ आणि $PM_{2.5}$) वाढीव भूपृष्ठीय तिव्रतेचा (Incremental Ground Level Concentrations & GLCs) अंदाज घेण्यासाठी वायू प्रसारण मॉडेलिंग (Air Dispersion Modelling) करण्यात आले. हे मॉडेलिंग स्थळ–विशिष्ट हवामानविषयक माहिती, भूप्रदेशाची वैशिष्ट्ये, स्टॅक (चिमणी) मापदंड तसेच सर्वाधिक उत्सर्जनाच्या परिस्थितींचा विचार करून करण्यात आले, त्साप्रमाणे परिणामांचे सावधगिरीपूर्वक मूल्यमापन सुनिश्चित करता येईल

मॉडेलिंग परिणामांचे विश्लेषण (Analysis of Modelling Results) खालील प्रमाणे आहेत

- $PM_{10}$ ची कमाल वाढीव तिव्रता वायुच्या दिशेने (Downwind Direction) सुमारे 450 मीटर अंतरावर 0.221 µg/m³ इतकी आहे.
- $PM_{2.5}$ ची कमाल वाढीव तिव्रता वायुच्या दिशेने सुमारे 500 मीटर अंतरावर 0.108 µg/m³ इतकी आहे.

या वाढीव तिव्रता मूल्यांना निरीक्षित पायाभूत (Baseline) वायू गुणवत्तेच्या पातळ्यांमध्ये समाविष्ट केल्यावर, सर्व आठ निरीक्षण केंद्रांवरील (Receptors) परिणामी तिव्रता राष्ट्रीय वातावरणीय वायू गुणवत्ता मानके (NAAQS) यांच्या मर्यादेत होती.

मॉडेलिंग अभ्यासावरून असे स्पष्ट होते की प्रस्तावित प्रकल्पाचा परिसरातील परिवेशी वायू गुणवत्तेवर अत्यल्प (Negligible) वाढीव परिणाम होईल. प्रस्तावित वायू प्रदूषण नियंत्रण उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास, अभ्यास क्षेत्रातील वायू पर्यावरण राष्ट्रीय परिवेशी वायू गुणवत्ता मानकांशी (NAAQS) सुसंगत राहील.

### ध्वनी प्रदूषण आणि नियंत्रणाचे उपाय

ध्वनिची पातळी कोणत्याही वेळी केंद्रीय प्रदूषण मंडळाद्वारे ठरविलेल्या मानकापेक्षा अधिक असणार नाही. उपकरण ध्वनि नियंत्रण यंत्राचा वापर करून बनविण्यात येतील. कोणत्याही उपकरणाद्वारे उत्पन्न ध्वनिची पातळी उपकरण्यापासून कुठल्याही दिशेत 1.0 मी च्या अंतरापर्यंत 85 dB(A) पेक्षा अधिक नसणार. संपीड्य व असंपीड्य (compressible & incompressible) द्राव्यच्या हाताळणीसहित संबंधित असलेले वाल्व व पाइप मध्ये उत्पन्न ध्वनि स्त्रोता त्यापासून 1.0 मी अंतरापर्यंत कमी ध्वनि ट्रीम, बफल प्लेट ध्वनि रोधक/लाइन ध्वनि रोधक, जाड आवरणाचे पाइप यांचा जसा व जेव्हा आवश्यक आहे वापर करून ध्वनी तिव्रता 75 dB(A) पेक्षा कमी करण्यात येईल. ध्वनि कमी करण्याकरिता सर्वसाधारण नियंत्रण उपाय खाली दिलेले आहेत.

- ज्या ठिकाणी इतर उपाययोजनांद्वारे ध्वनिचे नियंत्रण प्रभावीपणे करता येत नाही, त्या ठिकाणी ध्वनि निर्माण करणाऱ्या उपकरणांना ध्वनिरोधक आवरण प्रदान करणे.
- ध्वनि उत्पन्न करणाऱ्या उपकरणांना चालविण्याकरिता ध्वनि रोधक कमरा उपलब्ध करण्यात येईल जेथे दूरवर्ती नियंत्रकाद्वारे उपकरण चालविण्यात

येतील

- आराखडा/संचमांडणी करतांना काळजी घेणे, यंत्र निर्मात्याद्वारे नमुद केलेल्या ध्वनि नियंत्रणाचे सक्तीने पालन करण्यात येईल.
- उच्च ध्वनि उत्पन्न स्त्रोतांना पर्याप्त ध्वनि रोधक आवरण पुरविण्यात येईल.
- अधिक ध्वनी असलेल्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ईअर मोफलर, ईअर प्लग पुरविण्यात येईल
- इनलेट आणि आऊटलेटला मफलर्स पुरविण्यात येतील ज्याची बनावट व बांधणीसोपी राहिल.
- सर्व फिरत्या वस्तुंना चांगल्या प्रकारे ऑयलिंग करण्यात येईल व शक्य तितके ध्वनि संचार कमी करण्याकरिता आवरण पुरविण्यात येतील. तपासणी व कंपन कमी करण्याकरिता व्यापक कंपन तपासणी प्रणाली पुरविण्यात येईल. जेव्हा जेव्हा शक्य असेल कंपन व ध्वनि कमी करण्याकरिता कंपन आयसोलेटिंग पुरविण्यात येईल.

**पाण्यावर होणारा परिणाम**

प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रक्रिया टप्प्या दरम्यान, मुख्यतः औद्योगिक प्रक्रियांमधून आणि घरगुती वापरातून सांडपाणी निर्माण होईल. अशा सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन न केल्यास, ते भुपृष्ठ तसेच भूजलाच्या गुणवत्तेसाठी धोका निर्माण करू शकते.

प्रकल्पाच्या प्रक्रिया टप्प्या दरम्यान एकूण औद्योगिक सांडपाणी निर्मिती सुमारे 379 KLD इतकी राहिल आहे. हे सांडपाणी प्रामुख्याने पिकलिंग प्रक्रिया, रिन्सिंग (धुण्याच्या प्रक्रिया), कूलिंग, उपकरणांची स्वच्छता आणि इतर प्रक्रिया–संबंधित उपक्रमांमधून निर्माण होईल. याशिवाय, स्वच्छतागृहे आणि कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन वापरामुळे सुमारे 24 KLD घरगुती सांडपाणी निर्माण होणे अंदाजित आहे.

**नियंत्रण उपाययोजना (Mitigation Measures)**

- प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्याच्या शुद्धीकरणासाठी पुरेशा क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प स्थापित केला जाईल.

- प्रक्रिया, कूलिंग, उपयुक्तता आणि हरितपट्टा विकासासाठी प्रक्रिया केलेल्या औद्योगिक सांडपाण्याचा प्रकल्प परिसरात पुनर्वापर केला जाईल, ज्यामुळे स्वच्छ पाण्याचा वापर कमी होईल.
- स्वच्छतागृह आणि इतर घरगुती वापरातून निर्माण होणारे सांडपाणी (STP) मध्ये प्रक्रिया केले जाईल.
- प्रक्रिया केलेल्या घरगुती सांडपाण्याचा वापर वृक्षारोपण आणि हरितपट्टा विकासासाठी केला जाईल.
- पिकलिंग प्रक्रियेतून निर्माण होणारे आम्लयुक्त सांडपाणी ETP मध्ये प्रक्रिया करण्यापूर्वी न्यूट्रिलाइझड केले जाईल.
- औद्योगिक सांडपाणी, घरगुती सांडपाणी आणि पावसाचे पाणी यांच्यासाठी स्वतंत्र निचरा व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल.
- रसायनांची हाताळणी व साठवणूक क्षेत्रांमध्ये अभेद्य (Impervious) फरशी आणि गळतीरोधक संकलन व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल,
- प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याच्या गुणवत्तेचे नियमित निरीक्षण केले जाईल, जेणेकरून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) यांच्याद्वारे निर्धारित मानकांचे पालन सुनिश्चित करता येईल.
- प्रभावी जलव्यवस्थापन आणि पुनर्वापर सुनिश्चित करण्यासाठी फ्लो मीटर आणि जलनिरीक्षण प्रणाली स्थापित केल्या जातील.
- भूजल पातळी वाढविण्यासाठी आणि स्वच्छ पाण्याचा वापर कमी करण्यासाठी प्रकल्प परिसरात रेन वॉटर हार्वेस्टींग संरचना विकसित केली जाईल.
- पाइपलाइन, टाक्या आणि पंप यांची नियमित देखरेख तसेच चांगल्या हाऊसकिपिंग पद्धती अवलंबल्या जातील, ज्यामुळे गळती आणि अपघात टाळता येईल.
- शाश्वत जलव्यवस्थापन साध्य करण्यासाठी प्रकल्पामध्ये सांडपाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर आणि जलसंवर्धन उपाययोजनांवर भर दिला जाईल.

वरील नियंत्रण उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास, प्रस्तावित प्रकल्पामुळे जलपर्यावरणावर कोणताही लक्षणीय प्रतिकूल परिणाम होण्याची अपेक्षा नाही.

**घनकचरा निर्मिती**

प्रस्तावित उपक्रमा मध्ये निर्मित घनकचरा/उप–उत्पादन खालील तक्त्यात दिलेला आहे.

**तक्ता : घन व घातक कचऱ्याची निर्मिती आणि नियंत्रण उपाय**

| अनु क्र. | घातक कचरा | मात्रा | विल्हेवाट |
|---|---|---|---|
| **CIPL प्लांट (पिकलिंग, रिडक्शन मिल आणि अलुझिंक/गॅल्व्हनायझिंग लाइन्स)** | | | |
| **घातक कचऱ्याचा तपशिल** | | | |
| 1 | वापरलेले तेल | 55 KL / Annum | मे. *MHEMC यांच्यामार्फत पाठवले जाईल आणि अधिकृत पुनर्प्रक्रिया करणारे /पुनर्वापर करणारे / सिमेंट उद्योगांकडे, भट्टीमध्ये (kiln) पर्यायी इंधन म्हणून वापरण्यासाठी पाठवण्यात येईल. |
| 2 | ETP स्लज्ड | 70 TPM | मे. *MHEMC द्वारे सुरक्षित जमिन सपाट करण्यासाठी TSDF कडे पाठविण्यात येईल. |
| 3 | MEE सॉल्ट | 25 TPM | मे. *MHEMC द्वारे सुरक्षित जमिन सपाट करण्यासाठी TSDF कडे पाठविण्यात येईल. |
| 4 | टाकाऊ आम्लारी द्रावण | 1200 KL PD | याची विल्हेवाट मे. *MHEMC यांच्यामार्फत लावली जाईल तसेच, ॲसिड पुनर्निर्मिती प्रकल्प (Acid Regeneration Plant) पूर्ण झाल्यानंतर, याचे पुन्हा प्रक्रियेमध्ये पुनर्चक्रीकरण केले जाईल. |
| 5 | झिंक ड्रोस | 200 TPM | मे. *MHEMC यांच्यामार्फत अधिकृतपणे पुनर्प्रक्रियेसाठी विल्हेवाट लावली जाईल. |
| **घातक नसलेल्या कचऱ्याचा तपशिल** | | | |
| 6 | दुय्यम कॉइल आणि शिट (By product) | 35 T Per Day | धातू पुनर्वापर उद्योगांना उपउत्पादने म्हणून विकण्यात येईल. |
| 7 | एचआरपीओ, सीआर कॉइल, जीआय/जीएल कॉइल | 50 T Per Day | धातू पुनर्वापर उद्योगांना उपउत्पादने म्हणून विकण्यात येईल. |

| **CIPL प्लांट (कलर कोटेड लाइन)** | | | |
|---|---|---|---|
| 1 | त्रृटियुक्त लेपन असलेले कॉइल आणि शिट | 20 T Per Day | अधिकृत पुनर्वापरकर्ते / पुनर्प्रक्रियाकारांकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात येईल. |
| 2 | DG सेट पासून निघणारे टाकावू आयल | 130 L PA | अधिकृत पुनर्वापरकर्ते / पुनर्प्रक्रियाकारांकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात येईल. |
| 3 | ETP स्लज्ड | 70 MT PM | मे. *MHEMC यांच्यामार्फत अधिकृतपणे पुनर्प्रक्रियेसाठी विल्हेवाट लावली जाईल. |
| 4 | अल्कली ट्युब पासून स्लज्ड | 10 Kg PM | मे. *MHEMC यांच्यामार्फत अधिकृतपणे पुनर्प्रक्रियेसाठी विल्हेवाट लावली जाईल.. |
| 5 | पेंट स्लज्ड | 10 T PM | मे. *MHEMC यांच्यामार्फत अधिकृतपणे पुनर्प्रक्रियेसाठी विल्हेवाट लावली जाईल. |

*MHEMC:- महाराष्ट्र घातक कचरा व्यवस्थापन केंद्र

## 6.0 पर्यावरणीय निरिक्षण कार्यक्रम

प्रकल्पाच्या बांधकाम व प्रक्रिया टप्प्यांदरम्यान CPCB/SPCB मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची परिणामकारकता तपासण्यासाठी पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल. निर्धारित नियमांनुसार नियमित अंतराने परिवेशी वायुची गुणवत्ता ($PM_{10}$, $PM_{2\text{-}5}$, $SO_2$, NOx), चिमनीतील उत्सर्जन पाण्याची गुणवत्ता, ध्वनी पातळी आणि मातीची गुणवत्ता यांचे निरीक्षण केले जाईल. प्रमुख उत्सर्जन स्रोतांसाठी ऑनलाइन निरीक्षण प्रणाली (CEMS/CEQMS) स्थापित करण्यात येतील.

निरीक्षणाशी संबंधित सर्व कामकाजाचे पर्यवेक्षण करण्यासाठी, नोंदी राखण्यासाठी आणि नियामक प्राधिकरणांना वेळेवर अहवाल सादर करण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण व्यवस्थापन सेल स्थापन करण्यात येईल. हा कार्यक्रम संभाव्य पर्यावरणीय परिणामांचे लवकर निदान करण्यास आणि आवश्यक सुधारात्मक उपाययोजना तात्काळ राबविण्यास मदत करेल, ज्यामुळे प्रकल्पाचे शाश्वत व पर्यावरणपूरक संचालन सुनिश्चित होईल.

## 7.0 अतिरिक्त अभ्यास

MoEF&CC द्वारे जारी केलेले ToR मुद्दांनुसार अतिरिक्त अभ्यास मध्ये जोखिम मुल्यांकन व आपत्ति व्यवस्थापन योजना ही समाविष्ट केली आहे.

## 8.0 प्रकल्पाचे फायदे

### कार्पोरेट पर्यावरण उत्तरदायित्व (CER)

विकासात्मक उपक्रम स्थानिक समुदायाच्या प्राधान्यतेवर आधारित राहिल आणि त्यामध्ये स्थानिक योगदान महत्त्वाचे राहिले. सामाजिक प्रभाव मूल्यांकन आणि सार्वजनिक जनसुनावणी दरम्यान ओळखल्या गेलेल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत उपक्रमांमध्ये करण्यात येईल. या दृष्टिकोनामुळे स्थानिक लोकांना लाभ होईल.

### CER बजेट

- सार्वजनिक सुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार CER बजेट सार्वजनिक सुनावणी नंतर निश्चित केले जाईल.
- सार्वजनिक सुनावणीत उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर आधारित ही रक्कम विविध उपक्रमांमध्ये खर्च केली जाईल.
- CER उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर CSR अंतर्गत विविध गावामध्ये खर्च करण्यात येईल.
- प्रकल्पाच्या कार्यकाळापर्यंत CSR उपक्रम नियमित असेल.

## 9.0 पर्यावरण व्यवस्थापन योजना

प्रकल्पाच्या बांधकाम आणि प्रक्रिया टप्प्यांदरम्यान पर्यावरण व्यवस्थापन योजना लागू केली जाईल. EMP अंतर्गत भांडवली कामकाजाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्पाने रु. 900 लाखांचा बजेट राखून ठेवला आहे, शिवाय पर्यावरणीय पायाभूत सुविधा चालविणे आणि देखभाल करण्यासाठी वार्षिक पुनरावृत्ती बजेट दरवर्षी मंजूर केले जाईल. प्रस्तावित प्रकल्पाच्या गरजेनुसार एक पर्यावरण व्यवस्थापन कक्ष स्थापन केला जाईल.

## पर्यावरण व्यवस्थापन खर्च

| अनु क्र. | घटक | विवरण | भांडवली खर्च रू. लाखा मध्ये | प्रक्रिया व देखरेख मुल्य रू. लाखा / वर्ष मध्ये |
|---|---|---|---|---|
| 1 | वायु प्रदूषण नियंत्रण प्रणाली | बॉयलर, पिक्लिंग, GL आणि DG स्टॅक | बॉयलर चिमनी – 40<br>पिकलिंग चिमनी – 40<br>वाइडर कंटीन्युअस गॅल्व्हा लाइन चिमनी – 40<br>DG संच स्टॅक – 10<br>**एकूण – 130** | 30 |
| 2 | जल प्रदूषण नियंत्रण प्रणाली | ETP, STP, RO, UF आणि MEE (ZLD) यंत्रणा, MEE साठी बॉयलर (वाफेवर चालणारा) केमिकल, स्पेअर आणि कंत्राटी मनुष्यबळ | STP 160 KLD - 145<br>WTP 120 KLD - 30<br>MEE 200 KLD - 600<br>**एकूण – 774** | 230 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन | ETP व पेंट स्लज, वापरलेले आयल हाताळणे आणि थर्ड पार्टी विक्रेत्यामार्फत विकून विल्हेवाट लावणे | ETP 600 KLD – 145<br>मुंबई वेस्ट मॅनेजमेंट | 85 |
| 4 | NABL/MOEF मान्यताप्राप्त प्रयोगशाळेद्वारे पर्यावरणीय निरिक्षण | वायु गुणवत्ता, पाणी व सांडपाणी गुणवत्ता, ध्वनि पातळी, मृदा गुणवत्ता | CFE, ऑनलाइन मॉनिटरिंग उपकरण – 20 | 5 |
| 5 | हरितपट्टा | 15 % वृक्षारोपण | 100 | 90 |
| **एकुण** | | | **रू. 1170 लाख** | **रू. 440 लाख** |

### हरितपट्टा विकास

प्रकल्प परिसरामध्ये एकूण प्रकल्प क्षेत्राच्या सुमारे 1.74 हेक्टर (15:) क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे. हरित पट्टा विकासासाठी वृक्षारोपणाचे काम केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येईल तसेच स्थानिक प्रजातींना प्राधान्य दिले जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाभोवती विकसित करण्यात येणारा हरित पट्टा किंवा वृक्षारोपण परिसरातील कणीय प्रदूषणाचे परिणाम कमी करण्यास मदत करेल तसेच पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावेल. प्रस्तावित प्रकल्पासाठी हरित पट्टा विकास आणि वृक्षारोपण कार्यक्रम हा प्रस्तावित आराखड्याचा एक महत्त्वाचा भाग असेल.

एकूण 1.74 हेक्टर क्षेत्र टप्प्याटप्प्याने हरित पट्ट्यासाठी विकसित करण्यात येईल. सुमारे 4350 झाडांची लागवड करण्यात येणार आहे. वृक्षांच्या प्रमुख प्रजाती CPCB च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार निवडल्या जातील.

## 10.0 निष्कर्ष

एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, उमरेड, जि. नागपूर, महाराष्ट्र येथे 6,00,000 टीपीए क्षमतेचे पिकल्ड हॉट रोल्ड (HR), कोल्ड रोल्ड फुल हार्ड कॉइल्स (CRFH) गॅल्वनाइज्ड/अलुझिंक तसेच कलर कोटेड PPGI/PPGL कॉइल्स/शीट्स उत्पादनासाठी कलरशाईन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचा प्रस्तावित प्रकल्प हा प्रदेशाच्या औद्योगिक वाढीस आणि सामाजिक–आर्थिक विकासास हातभार लावणारा ठरेल. अभ्यास क्षेत्रातील मूलभूत पर्यावरणीय गुणवत्ता निर्धारित मानकांच्या मर्यादेत असून, अपेक्षित पर्यावरणीय परिणाम प्रस्तावित प्रदूषण नियंत्रण प्रणाली आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) यांच्या माध्यमातून प्रभावीपणे कमी करता येऊ शकतात. वायू प्रदूषण नियंत्रण, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा हाताळणी, हरित पट्टा विकास तसेच व्यावसायिक आरोग्य व सुरक्षितता यासाठी पुरेशा उपाययोजना राबविण्यात येतील. आवश्यक पर्यावरणीय संरक्षणात्मक उपाययोजनांचा अवलंब आणि वैधानिक अटींचे पालन केल्यास, प्रस्तावित प्रकल्प पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत पद्धतीने विकसित व कार्यान्वित केला जाऊ शकतो.